| MHSO200023602022 | **नियमित दिवाणी दावा क्र. ६००/२०२२** |
|---|---|

## निशाण क्र. ३५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ ते ५, १५(ब) व १५(क) यांनी त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफीयत आदेश रद्द होऊन त्यांची कैफीयत स्वीकारण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जात प्रतिवादी क्र. ३ ते ५, १५(ब) व १५(क) यांचे कथन असे आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द सदरचा दावा साठेखतावरुन खरेदीखत होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरील प्रतिवादी यांना दाव्यातील समन्सची बजावणी दि. १५/१२/२०२२ रोजी झालेली आहे. परंतु, सदरचे प्रतिवादी हे अडाणी, अशिक्षीत असल्याने व त्यांना ज्ञान नसल्यामूळे व जुनी कागदपत्रे वेळेत मिळाली नसल्यामूळे त्यांना कैफीयत दाखल करता आली नाही. त्यामूळे सदर प्रतिवादी यांच्याविरुध्द विनाकैफीयत आदेश पारीत झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणूनबुजून केलेला नाही. सदर प्रतिवादींचे प्रस्तुत दावा मिळकतीत मौलीक हक्क गुंतलेले असून सदरचा दावा हा स्थावर मिळकतीसंबंधी आहे. सदरचा विनाकैफीयत आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र. ३ ते ५, १५(ब) व १५(क) यांचेविरुध्द झालेल्या विनाकैफीयतचा आदेश रद्द होऊन त्यांची कैफीयत दाखल करण्यास परवानगी मिळावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

**३.** प्रस्तुत अर्जास वादींनी म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज खोटा, बनावट व लबाडीचा असून वादी यांना मान्य व कबूल नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**४.** उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रतिवादी

यांच्याविरुध्द सदरचा दावा साठेखतावरुन खरेदीखत होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जात सदरील प्रतिवादी यांना दाव्यातील समन्सची बजावणी दि. १५/१२/२०२२ रोजी झालेली असून सदरचे प्रतिवादी हे अडाणी, अशिक्षीत असल्याने व त्यांना ज्ञान नसल्यामूळे व जुनी कागदपत्रे वेळेत मिळाली नसल्यामूळे त्यांना कैफीयत दाखल करता आली नाही असे कारण नमूद केले आहे. सदर कथनाच्या पृष्ट्यार्थ त्यांनी नि.क्र. ३६ वर शपथपत्र दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांच्या अर्जात नमूद असलेले कारण तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी त्यांच्याविरुध्द झालेला विनाकैफीयतचा आदेश रद्द करणे हे न्यायाचे ठरेल. जर प्रतिवादी यांच्याविरुध्द झालेला विनाकैफीयतचा आदेश रद्द करुन त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांच्या न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. प्रतिवादी यांनी त्यांची कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होण्यासाठी नि.क्र. ३३ वर अर्ज दाखल केला असून सदरचा अर्ज या न्यायालयाने आजरोजी मंजूर केला आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ ते ५, १५(ब) व १५(क) यांनी नि.क्र. ३३ वरील आदेशाची पुर्तता करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. ३ ते ५, १५(ब) व १५(क) यांनी नि.क्र. ३३ वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर त्यांचेविरुध्द झालेला विना कैफीयतचा आदेश रद्द होऊन त्यांची कैफीयत स्वीकारण्यात येईल.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2026.05.07 13:19:16 +0530

**(एस. एस. साळुंखे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

दिनांक – ०७/०५/२०२६.

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | २ रे सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ०७/०५/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | ०७/०५/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | ०७/०५/२०२६ |